भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# धार्मिक संस्था (दुरुपयोगास प्रतिबंध) अधिनियम, १९८८

(१९८८ चा अधिनियम क्रमांक ४१)

[२ मे १९९७ रोजी यथाविद्यमान]

# The Religious Institutions (Prevention of Misuse) Act, 1988

**(Act No. 41 of 1988)**

[*As in force on the 2nd May 1997*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
(१९९९)

[ किंमत : रु. ३-०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २ मे १९९७ रोजी यथाविद्यमान असलेला दि रिलिजस् इंस्टीटयूशन्स (प्रिव्हेन्शन ऑफ मिसयूज) अ‍ॅक्ट, १९८८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ८, अंक १, दिनांक २२ ऑक्टोबर १९९७ यात पृष्ठ ५१ ते ५३ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :<br>दिनांक २२ ऑक्टोबर १९९७.

**डॉ. रघबीर सिंग,**<br>सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Religious Institutions (Prevention of Misuse) Act, 1988 as on the 2nd May 1997 contain the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1,(Vol. 8) dated 22nd October 1997 on pages 51 to 53.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :<br>Dated 22nd October 1997.

DR. RAGHBIR SINGH,<br>Secretary to the Government of India.

एच ४४३६ (१०३९—१०-९८)

# धार्मिक संस्था (दुरुपयोगास प्रतिबंध) अधिनियम, १९८८

## कलमांचा क्रम


कलमे

प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. विवक्षित प्रयोजनार्थ, धार्मिक संस्थांचा वापर करण्यास प्रतिषेध.

४. धार्मिक संस्थेत शस्त्रे व दारूगोळा बाळगण्यावर निर्बंध.

५. विवक्षित कार्यासाठी धार्मिक संस्थेच्या निधीचा वापर करण्यास प्रतिषेध.

६. धार्मिक संस्थांनी राजकीय विचारांचा प्रचार करण्यास प्रतिषेध.

७. शास्ती.

८. अधिनियमाखाली दोषसिद्धी करण्यात आलेल्या दोषारोपपत्र बजावण्यात आलेल्या व्यक्तीस निरर्ह ठरविणे.

९. पोलिसांना माहिती देण्यास बांधील असणाऱ्या विवक्षित व्यक्ती.

१०. निरसन व व्यावृत्ती.

# धार्मिक संस्था (दुरुपयोगास प्रतिबंध) अधिनियम, १९८८

**(१९८८ चा अधिनियम क्रमांक ४१)**

(२ मे १९९७ रोजी यथाविद्यमान)

[१ सप्टेंबर, १९८८]

**धार्मिक संस्थांचा राजकीय आणि अन्य प्रयोजनांसाठी गैरवापर करण्यास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या एकोणचाळीसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :—

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास धार्मिक संस्था (दुरुपयोगास प्रतिबंध) अधिनियम, १९८८ असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार, जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

(३) तो, २६ मे, १९८८ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**व्याख्या.**

२. या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क्) "दारूगोळा" याचा अर्थ, शस्त्र अधिनियम, १९५९ (१९५९ चा ५४) याचे कलम २, पोटकलम (१) च्या खंड (ख्) मध्ये त्याला जसा अर्थ आहे, तसाच आहे ;

(ख्) "शस्त्र" याचा अर्थ, शस्त्र अधिनियम, १९५९ (१९५९ चा ५४) याचे कलम २, पोटकलम (१) च्या खंड (ग्) मध्ये त्याला जसा अर्थ आहे, तसाच आहे ;

(ग्) "व्यवस्थापक" याचा एखाद्या धार्मिक संस्थेच्या संबंधातील अर्थ, त्या त्या काळी एकतर एकटी किंवा अन्य व्यक्ती बरोबर त्या संस्थेच्या कारभाराचे तिच्या कामांचे किंवा संपत्तीचे प्रशासन, व्यवस्थापन किंवा अन्यथा नियमन करते, ती (कोणत्याही नावाने ओळखली जाणारी) कोणत्याही धार्मिक कृतिकारिणीसह प्रत्येक व्यक्ती असा आहे ;

(घ्) "राजकीय कार्य" या व्याख्येत सभा, निदर्शन, मिरवणुका, विधीचे संचयन किंवा संवितरण या गोष्टी आयोजित करून किंवा निदेश देऊन हुकूमनामा काढून किंवा अन्य कोणत्याही मार्गाने राजकीय पक्षाचे ध्येय किंवा उद्दिष्ट किंवा कोणताही राजकीय स्वरूपाचा हेतू, वादप्रश्न किंवा प्रश्न यांचे प्रवर्धन किंवा प्रचार करणारे कार्य आणि त्यामध्ये संसदेच्या कोणत्याही राज्य विधान मंडळाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीकडून किंवा तिच्या वतीने, करण्यात आलेल्या अशा कार्याचा देखील समावेश होतो.

(ङ्) "राजकीय पक्ष" याचा अर्थ,—

(एक) निवडणूक चिन्हे (आरक्षण व वाटप) आदेश, १९६८ अन्वये राजकीय पक्ष म्हणून भारताच्या निर्वाचन आयोगाकडे ज्याची नोंदणी झालेली आहे किंवा नोंदणी झाली असल्याचे मानण्यात आले असेल असा ; किंवा

(दोन) ज्याने कोणत्याही विधान मंडळाच्या निवडणुकीसाठी उमेदवार उभे केले आहेत, परंतु, निवडणूक चिन्हे (आरक्षण आणि वाटप) आदेश, १९६८ अन्वये राजकीय पक्ष म्हणून ज्याची नोंदणी झालेली नाही किंवा नोंदणी झाली असल्याचे मानण्यात आले नसेल असा—

(तीन) कोणतीही राजकीय कार्ये करण्याकरिता किंवा निवडणुकीच्या माध्यमातून किंवा अन्यथा राजकीय शक्ती प्राप्त करण्याकरिता किंवा तिचा वापर करण्याकरिता संघटीत केलेला ;

व्यक्तींचा अधिसंघ किंवा व्यक्तींचा निकाय असा आहे.

(च्) "धार्मिक संस्था" याचा अर्थ, कोणत्याही धर्माच्या किंवा धर्ममताच्या प्रवर्धनार्थ एखादी संस्था असा आहे ; आणि त्यात कोणत्याही नावाने किंवा पदनामाने ओळखल्या जाणाऱ्या धार्मिक उपासना करण्याची सार्वजनिक जागा म्हणून वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही जागेचा किंवा कोणत्याही वास्तूचा समावेश होतो.

**विवक्षित प्रयोजनार्थ धार्मिक संस्थांचा वापर करण्यास प्रतिबंध.**

३. कोणतीही धार्मिक संस्था किंवा तिचा व्यवस्थापक, संस्थेच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील कोणत्याही वास्तूचा वापर—

(क्) कोणत्याही राजकीय कार्यक्रमाच्या प्रवर्धनासाठी किंवा प्रचारासाठी ; किंवा

(ख) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये एखाद्या अपराधाचा आरोप असलेल्या किंवा अपराधाबद्दल सिद्धदोषी ठरविलेल्या कोणत्याही व्यक्तीला आसरा देण्यासाठी ; किंवा

(ग) कोणत्याही शस्त्राचा किंवा दारूगोळ्याचा साठा करण्यासाठी ; किंवा

(घ) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याचे व्यतिक्रमण करून कोणताही माल किंवा चीजवस्तू ठेवण्यासाठी ; किंवा

(ङ) त्यात्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विधिग्राह्य लायसन किंवा परवानगी न घेता, तळघरे, कोठारे, मनोरे किंवा भिंतीसह कोणतेही बांधकाम किंवा तटबंदी उभारण्यासाठी किंवा करण्यासाठी ; किंवा

(च) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये प्रतिसिद्ध केलेली किंवा कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे व्यतिक्रमण करून केली जाणारी कोणतीही बेकायदेशीर किंवा विघातक कृती चालू ठेवण्यासाठी ; किंवा

(छ) जी कृती भिन्न धार्मिक, वांशिक, भाषिक किंवा प्रादेशिक गटांमध्ये, किंवा जातींमध्ये किंवा समाजांमध्ये विसंवाद किंवा शत्रुत्वभावना किंवा तिरस्काराची भावना किंवा द्वेष भावना वाढीस लावील किंवा ती वाढीस लावण्याचा प्रयत्न करील अशी कोणतीही कृती करण्यासाठी; किंवा

(ज) भारताच्या सार्वभौमत्वाला, ऐक्याला व एकात्मतेला बाधक ठरणारी कोणतीही कृती चालू ठेवण्यासाठी ; आणि

(झ) राष्ट्र प्रतिष्ठा अपमान प्रतिबंध अधिनियम, १९७१ (१९७१ चा ६९) याच्या उपबंधाचे व्यतिक्रमण करणारी कोणतीही कृती करण्यासाठी ;
करणार नाही किंवा वापर करण्यास मुभा देणार नाही.

**धार्मिक संस्थेत शस्त्रे व दारूगोळा किंवा बाळगण्यावर निर्बंध.**

४. कोणतीही धार्मिक संस्था किंवा तिचा व्यवस्थापक धार्मिक संस्थेत कोणत्याही शस्त्राच्या दारूगोळ्याच्या प्रवेशास किंवा कोणतीही शस्त्रे किंवा दारूगोळा बाळगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या प्रवेशास मुभा देणार नाही :

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट :—

(क) शीख धर्माची म्हणविणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किरपाण धारण करण्यास आणि बाळगण्यास ; किंवा

(ख) जी शस्त्रे, रुढीने किंवा परिपाठाने प्रस्थापित झाल्यामुळे संस्थेच्या कोणत्याही धार्मिक समारंभाचा किंवा धार्मिक विधिचा भाग म्हणून वापरली जातात, अशा कोणत्याही शस्त्रास ;
लागू होणार नाही.

**विवक्षित कार्यासाठी धार्मिक संस्थेच्या निधीचा वापर करण्यास प्रतिषेध.**

५. कोणतीही धार्मिक संस्था किंवा तिचा व्यवस्थापक, कोणत्याही राजकीय पक्षाच्या लाभासाठी किंवा कोणत्याही राजकीय कार्याच्या प्रयोजनासाठी किंवा कोणत्याही कायद्याखाली जी कृती अपराध म्हणून शिक्षेस पात्र असेल अशा कोणत्याही कृतीसाठी, संस्थेच्या मालकीच्या किंवा संस्थेच्या नियंत्रणाखालील कोणत्याही निधीचा किंवा अन्य संपत्तीचा वापर करणार नाही किंवा वापर करण्यास मुभा देणार नाही.

**धार्मिक संस्थांनी राजकीय विचारांचा प्रचार करण्यास प्रतिषेध.**

६. कोणतीही धार्मिक संस्था किंवा तिचा व्यवस्थापक, कोणत्याही राजकीय कार्यासाठी वापर करण्याकरिता तिच्या विद्यमाने कोणताही समारंभ, उत्सव, धर्मसभा, मिरवणूक किंवा मेळावा आयोजित करण्यास किंवा भरविण्यास मुभा देणार नाही.

**शास्ती.**

७. कोणत्याही धार्मिक संस्थेने किंवा तिच्या व्यवस्थापकाने कलम ३, कलम ४, कलम ५ किंवा कलम ६ च्या उपबंधाचे व्यतिक्रमण केल्यास, असे व्यतिक्रमण करण्याशी संबंधित असलेला व्यवस्थापक आणि प्रत्येक व्यक्ती, पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

**अधिनियमाखाली दोषसिद्धी करण्यात आलेल्या किंवा दोषारोपपत्र बजावण्यात आलेल्या व्यक्तीस निरर्ह ठरविणे.**

८. (१) धार्मिक संस्थेचा कोणताही व्यवस्थापक किंवा अन्य कर्मचारी यास, या अधिनियमाखालील अपराधाचा दोष सिद्ध झाल्यावर त्याच्या पदावरून किंवा हुद्यावरून दूर करण्यात येईल आणि अन्य कोणत्याही कायद्यात काहीही विरुद्ध अंतर्भूत असले तरी, त्याला दोषसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी कोणत्याही धार्मिक संस्थेत व्यवस्थापक म्हणून किंवा अन्य कोणत्याही नात्याने नियुक्ती करण्यास निरर्ह ठरविण्यात येईल.

(२) धार्मिक संस्थेच्या कोणत्याही व्यवस्थापकावर किंवा अन्य कर्मचाऱ्यावर या अधिनियमाखालील एखाद्या अपराधाचा आरोप असल्यास आणि कोणत्याही न्यायालयात अशा व्यक्तीवर खटला चालवण्यासाठी दोषारोपपत्र दाखल करण्यात आल्यास आणि फिर्यादीची व आरोपीची बाजू ऐकल्यानंतर प्रथमदर्शनी प्रकरणात तथ्य आहे असे न्यायालयाचे मत झाल्यास, संपरीक्षा प्रलंबित, असेपर्यंत अशा व्यक्तीस शक्तींचा वापर करण्यास किंवा कर्तव्ये पार पाडण्यास निरुद्ध करणारा आदेश किंवा निदेश देईल.

(३) कोणत्याही व्यवस्थापकाला किंवा अन्य कर्मचाऱ्याला, पोटकलम (१) खाली पदावरून दूर करण्यात आल्यास किंवा पोटकलम (२) खाली त्याला निरुद्ध करण्यात आल्यास, अशा दूर करण्यामुळे किंवा अशा प्रकारे निरुद्ध करण्यात आल्यामुळे निर्माण झालेले रिक्त पद, उक्त धार्मिक संस्थेला लागू असणाऱ्या कायद्यात उपबंधित केल्यानुसार भरण्यात येईल.

**पोलिसांना माहिती देण्यास बांधील असणाऱ्या विवक्षित व्यक्ती.**

९. धार्मिक संस्थेचा प्रत्येक व्यवस्थापक किंवा अन्य कर्मचारी, या अधिनियमाच्या उपबंधाच्या केलेल्या कोणत्याही व्यतिक्रमणाची किंवा कोणत्याही संभाव्य व्यतिक्रमणाची माहिती, ज्याच्या स्थानिक अधिकारितेत धार्मिक संस्था स्थित आहे, अशा पोलीस ठाण्याचा प्रभारी असलेल्या अधिकाऱ्यास देण्यास बांधील राहील, आणि तसे करण्यास चुकणारा कोणीही व्यवस्थापक किंवा अन्य कर्मचारी, भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याच्या कलम १७६ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

**निरसन व व्यावृत्ती.**

१०. (१) धार्मिक संस्था (दुरुपयोगास प्रतिबंध) अध्यादेश, १९८८ (१९८८ चा अध्यादेश क्रमांक ३) याद्वारे निरसित केला आहे.

(२) असे निरसन केले असले तरी, उक्त अध्यादेशाखाली केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधांच्या अन्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा करण्यात आलेली कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई